# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/२०२५ दि.११ मार्च २०२५

जळगाव दि. ११ ( प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने आयोजित तिसऱ्या बहिणाबाई विद्यार्थी साहित्य संमेलनात स्वलिखित काव्यवाचनात हरिष सोनवणे, बोलीभाषा सादरीकरणात गणेश कोळी यांनी तर कथाकथनात हर्षदिव्य सोनवणे यांनी प्रथम क्रमांक प्राप्त केला. या संमेलनाचा समारोप १० मार्च रोजी सायंकाळी झाला.

समारोप प्रसंगी मंचावर कुलसचिव डॉ.विनोद पाटील, संमेलनाचे कार्याध्यक्ष ॲड अमोल पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य नितीन झाल्टे, अधिसभा सदस्य धिरज वैष्णव, दिनेश नाईक, प्रताप तत्वज्ञान केंद्राचे मानद संचालक प्रा. एस.डी. ओसवाल व विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ.जयेंद्र लेकुरवाळे हे होते.

या प्रसंगी कुलसचिव डॉ.विनोद पाटील यांनी सांगितले की साहित्य संमेलन हे विद्यार्थ्यांना त्यांचे साहित्य मांडण्यासाठी खुले व्यासपीठ आहे. विद्यार्थ्यांनी अशा संमेलनातून प्रेरीत होऊन भविष्यात साहित्यिक होण्याची संधी साधावी. कार्याध्यक्ष ॲड अमोल पाटील यांनी सांगितले की, यावेळी आपण प्रथमच कथा कथन हा साहित्य प्रकार सुरु केला आहे. साहित्यकृतीतून विद्यार्थ्यांनी समाजाला प्रभावीत केले पाहिजे. अशा संमेलनातून चांगले साहित्यिक भविष्यात घडतील अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी सागर कोळी, प्रिया दाभाडे व पुनम पाटील या विद्यार्थ्यांनी आपली मनोगत मांडले. परीक्षकांच्या वतीने प्रा. वासुदेव वले यांनी सांगितले की या संमेलनातून चांगली साहित्य निर्मिती होऊ शकते. सुरवातीस डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी संमेलनाचा अहवाल सादर केला. डॉ. संजय पाटील यांनी सुत्र संचालन केले तर डॉ.विवेकानंद चव्हाण यांनी आभार मानले. या संमेलनात झालेल्या स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे –

**काव्यवाचन –**

प्रथम - हरिष सोनवणे (केमीकल सायन्सेस प्रशाळा,कबचौ उमवि.)

द्वितीय – गायत्री पाटील (कला,वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय,धरणगाव)

तृतीय – रिया दाभाडे (पालेशा कला,वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय,धुळे)

उत्तेजनार्थ – रिया ठाकरे (सि.गो.पाटील महाविद्यालय, साक्री) आणि छाया चित्ते (एम.जी.एम.कला,वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय चोपडा)

**बोलीभाषा –**

प्रथम – गणेश कोळी (एम.जी.एम.कला,वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय चोपडा)

द्वितीय – सागर कोळी (समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर)

तृतीय - प्रणव पाटील (झेड . बी. पाटील महाविद्यालय, धुळे)

उत्तेजनार्थ – हर्षदा पाटील (नानभाऊ पाटील महाविद्यालय,मारवड) आणि श्वेता गवळे (कला,वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, सोनगीर)

**कथाकथन -**

प्रथम - हर्षदिव्य सोनवणे (एम.जी.एम.कला,वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय चोपडा)

द्वितीय – देवीदास पावरा (कला,वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, तळोदा)

तृतीय – नाजनीन पठाण (नानभाऊ पाटील महाविद्यालय,मारवड)

उत्तेजनार्थ – नंदीनी शिंदे (सि.गो.पाटील महाविद्यालय, साक्री) आणि पुनमबेन पाटील (कला,वाणिज्य, विज्ञान महाविद्यालय, तळोदा)

बातमी क्र. २

जळगाव दि. ११ ( प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील संगणक शास्त्र प्रशाळा आणि क्विक हिल फाऊंडेशन पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा सन्मान सोहळा नुकताचा पार पडला.

क्विक हिल फाऊंडेशन सोबत झालेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने संगणकशास्त्र प्रशाळेतील ४० सायबर सुरक्षा वॉरिअर्स यांनी जळगाव,धुळे व नंदुरबार या तिन जिल्ह्यातील १०० शाळा व महाविद्यालयात जाऊन ३०० प्रशिक्षण वर्ग घेतले व त्याद्वारे ७० हजार विद्यार्थी, ३० हजार नागरिकांचे प्रबोधन केले. त्या ४० सायबर स्वयंसेवकांचा सत्कार करण्यात आला. मयुर बंडे व निखिल हिरे यांना विजेते म्हणून तर अस्मिता पाटील व वैष्णवी पाटील यांना उपविजेते म्हणुन घोषित करण्यात आले. प्रियंका मराठे, प्रणित मराठे,प्रगती कोल्हे, सायली चौधरी, नेहा पाटील,स्नेहल पाटील,श्वेता चौधरी,शारदा अहिरराव यांनाही पारितोषीके देण्यात आली. पोलिस कर्मचारी सचिन सोनवणे व अरविंद वानखेडे तसेच या मोहिमेत सहभागी झालेल्या डॉ.विजेता सिंग यांचाही सत्कार करण्यात आला. अधिष्ठाता प्रा.अनिल डोंगरे, प्रशाळेचे संचालक प्रा.आर.जे.रामटेके, प्रा.सतिष कोल्हे, समन्वयक प्रा.राजु आमले यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ.सुनील पाटील)

जनंसपर्क अधिकारी